# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/12/2023 (सोमवार) दुपार

---

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत १५ किमी अंतरावर मोहळी कोहळी गावातील गोमती सभागृह येथे दिनांक ०७/१२/२०२३ चे १३.०० वा. ते १४.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– चंद्रशेखर काशीनाथ पाटील, वय ४५ वर्ष रा. गुमथडा ता. कळमेश्वर यांनी सन २०१७ मध्ये (एच. एफ. डिलक्स) हिरो कंपनीची एम.एच.–४०/बी.डी.–७५३२ क्रमांकाची गाडी कळमेश्वर येथून विकत घेतली होती. दि. ०७/१२/२०२३ रोजी १३/०० दरम्यान मोहळी कोहळी गावातील गोमती सभागृहच्या साईडला रोडच्या बाजूला त्यांची (एच. एफ. डिलक्स) हिरो कंपनीची मोटरसायकल क्र. एम.एच.४०/बी.डी.–७५३२ किंमती अंदाजे १५०००/–रू. ही हैंडल लॉक लावून उभी केली होती व परत १४/०० वा. घरी जाण्याकरिता ज्या ठिकाणी गाडी लावली होती त्या ठिकाणी आले असता त्यांना त्यांची मोटारसायकल दिसली नाही परीसरात व आजुबाजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही कोणीतरी अज्ञात इसमाने (एच.एफ. डिलक्स) हिरो कंपनीची मोटरसायकल क्र. एम.एच.४०/बी.डी.–७५३२ किंमती अंदाजे १५०००/–रू चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार प्रदिप गायकवाड मो.नं. ७९७२०४३२५४ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावर मौजा मौदा बसस्टॉप मौदा येथे दिनांक ०९/१२/२०२३ चे ११.०० वा. ते १२.०० वा. दरम्यान **आरोपी नामे–१) राजेश प्रजापती वय ४८ वर्ष, रा. टिव्ही टावर नागपुर २) एक अनोळखी इसम** यांनी फिर्यादी नामे– डॉ. सुशमा नागेश धुर्वे, वय ४८ वर्ष, रा. दाबा नागपुर हिच्या भाचीच्या क्लीनिक मध्ये येवुन सोन्याचे दागिने दाखवुन फिर्यादीस म्हटले कि मला पैशाची खुप गरज आहे सोनार दागिने गाहाण ठेवणार नाही तेव्हा फिर्यादी हिने आरोपीला म्हंटले कि मी सोने गाहाण करुन पैसे देतो तेव्हा आरोपी याने म्हटले कि तुम्ही कर्ज काढुन पैसे देवु नका तुमच्या जवळ जेवढे पैसे असतील ते दया त्या नंतर आरोपी याचा पुन्हा फिर्यादीला फोन आला तेव्हा आरोपी यानी फिर्यादिस विचारले कि तुम्ही मौदाला गुरुवारला या असे म्हटले असता तेव्हा फिर्यादी हीने सांगीतले कि शनिवारला मौदा येथे येते दिनांक ०९/१२/२०२३ चे ११/०० वा. ते १२/०० वा. दरम्यान फिर्यादी मौदा बसस्टॉप मौदा येथे पोहचले असता तेव्हा फिर्यादीला आरोपी राजेश प्रजापती याचा फोन आला कि तुम्ही पोहचले का असे विचारल्या नंतर दहा मिनीट मध्ये मौदा बसस्टॉप येथे राजेश प्रजापती व एक अनोळखी इसम आले तेव्हा फिर्यादीला त्यांनी विचारले कि पैसे आणले का तेव्हा फिर्यादीने त्यांना म्हटले हो पैसे आणले आहे तेव्हा राजेश प्रजापती वय ४८ वर्ष, रा. टिव्ही टावर नागपुर, एक अनोळखी इसम यांनी फिर्यादीला असली सोने असल्याचे सांगुन ते सोने फिर्यादीला दिले व फिर्यादी कडुन २०००००/– रु घेवुन गेले त्यानंतर फिर्यादी नागपुर येथे सोनाराच्या ज्वेलरच्या दुकाणा मध्ये चेक करण्यासाठी नेले असता तेव्हा फिर्यादीला सोनारानी हे सोने नकली आहे असे सांगीतले त्यावरुन फिर्यादीला माहित झाले आरोपी राजेश प्रजापती वय ४८ वर्ष, रा. टिव्ही टावर नागपुर व अनोळखी एक इसम यांनी फिर्यादीची फसवणुक करुन २०००००/– रु नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार भगवान चांदेवार मो. नं. ९७६५२२१११६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर